॥ प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥





खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब' श्रेणी

मराठी विभाग आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# लोकनेते शरद पवार जीवन व कार्य



## चर्चासत्र स्मरणिका ग्रंथ

दि. ५ व ६ फेब्रुवारी २०१६

संपादक
डॉ. बाळासाहेब अनुसे
डॉ. संजय शिंदे
प्रा. वर्षा कांबळे

C.S.M.'s Arts & Com. College
CHAKAN
410501
Tal-Khed, Dist-Pune.

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

# अनुक्रमणिका


→ * शरद पवार : एक द्रष्टा कृषितज्ज्ञ / प्रा. शिवाजी एंडाईत / ५
* लोकनेते शरद पवार यांची कृषिक्षेत्रातील कामगिरी / डॉ. प्रमोद भगवान पडवळ / ९
* लोकनेते मा. शरदचंद्रजी पवार : शैक्षणिक क्षेत्रातील महामेरू / प्रा. अतुल चौरे, प्रा. नंदकुमार उदार / १२
* लोकनेते शरद पवार व महिला आरक्षण / प्रा. डॉ. देशमुख सुनिता / १६
* मा. शरदचंद्रजी पवार : आदर्श लोकप्रतिनिधी / डॉ. क्षिरसागर लक्ष्मण अरुण / १९
* लोकनेते शरद पवार जीवन व कार्य / प्रा. कांबळे वर्षा विनायक / २१
* शरद पवार : व्यक्ती, कार्य आणि विचार / प्रा. डॉ. अरुण कोळेकर / २४
* लोकनेता : शरदचंद्रजी पवार / प्रा.कोल्हे सुखदेव विष्णू / २८
* लोकनेते शरद पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण / लता विठ्ठल खडसे / ३४
* लोकनेते – मा.ना. शरदचंद्रजी पवारसाो / प्रा.डॉ.संजय दगडू घोडेकर / ४०
* लोकनेते मा. शरद पवार अष्टपैलू व्यक्तिमत्त्व / प्रा. डॉ.राजेंद्र ठाकरे / ४४
* साहित्य व कलाप्रेमी शरदचंद्र पवार / डॉ. राजेंद्र थोरात / ४६
* लोकनेते शरद पवार यांचे साहित्य, कला व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान / प्रा. डॉ. राजेंद्र देवरे / ४९
* एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : शरदराव पवार / संदिप देशमुख / ५२
* मला भावलेले माननीय शरद पवार / डॉ.बाळासाहेब दिघे / ५५
* अष्टावधानी व्यक्तिमत्त्व : मा.खा.शरदरावजी पवार / प्रा. डॉ. संजय नगरकर / ५७
* भारत देशाला न लाभलेले सर्वोत्तम पंतप्रधान : शरदचंद्रजी पवारसाहेब / प्रा. प्रकाश बुवाजी पांढरमिसे / ६१
* मला आवडलेले शरद पवारांचे पैलू / डॉ.टी.आर.पाटील, खंडेराव काळे / ६५
* लोकनेते मा. शरद पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण / प्रा.हनुमंत भवारी / ६७
* लोकनेते शरदचंद्र पवार / सुमित रामदास भुजबळ / ७०
* लोकनेते शरद पवारांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण व त्यांच्या अंगी असणारे गुण / प्रा. तुषार प्रकाश भोसले / ७२
* प्रेरणांचा अखंड स्त्रोत लोकनेते शरद पवारसाहेब / प्राचार्य डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ / ७५
* लोकनेते मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब एक समाजशील राजकारणी : एक दृष्टिक्षेप / प्रा. राधाकिसन मुठे / ८२
* लोकनेते शरदचंद्र पवार जीवन व कार्य / प्रा.नितीन मोटे / ८५
* भारताला लाभलेला सर्वसामान्यांचा द्रष्टा नेता – शरदचंद्रजी पवार / प्रा. संजय गंगाराम मोरे / ९०
* शरदचंद्रजी पवार साहेब यांचा महिलाविषयक दृष्टिकोन / डॉ. बाबासाहेब शेंडगे / ९२
* शरद पवार : एक कुशल नेते / डॉ. लांडगे शिरीष / ९४
* शरद पवार लिखित 'लोक माझे सांगाती' आत्मचरित्रातील राजकीय विचार/प्रा.डॉ.बी.डी.अनुसे, प्रा.किरण रामदास गाढवे/९६
* लोकनेते शरदराव पवार चरित्रग्रंथाचे वाङ्मयीन मूल्यमापन / प्रा. डॉ. सुभाष आहेर / १००
* शरद पवार यांचे 'लोक माझे सांगाती'च्या निमित्ताने / डॉ. संतोष चव्हाण / १०४
* मान. खा. शरद पवार – राजकीय व वाङ्मयीन व्यक्तिदर्शन / प्रा.डॉ.मधुकर गणेश मोकाशी / १०८
* लोक माझे सांगाती....एक आकलन / डॉ.नानासाहेब शामराव यादव / ११३
* लोकनेते शरद पवार व्यक्ती आणि त्यांच्यावरील साहित्याचे स्वरूप / प्राचार्य डॉ. भास्कर शेळके / १२५
* ॲड. राम कांडगे लिखित 'लोकनेते शरदराव पवार' या चरित्रग्रंथाचा परिचय / डॉ. संजय शिंदे / १३५
* शरद पवारांचे आत्मचरित्र 'काटेवाडी ते दिल्ली' / डॉ. शशिकांत साळवे / १३९


C.S.M's Arts & Commerce College Chakan 410501 Tal-Khed, Dist-Pune
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

# शरद पवार : एक द्रष्टा कृषितज्ज्ञ

प्रा. शिवाजी एंडाईत

देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात स्वातंत्र्योत्तर काळात यशवंतराव चव्हाणांनंतर एक मुत्सद्दी, द्रष्टे नेतृत्व म्हणून शरद पवारांच्याच नावाचा उल्लेख करावा लागतो. राजकारणाबरोबरीनेच साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा, शेती, सहकार व उद्योग इ. विविध क्षेत्रांतील त्यांची अभिरुची अद्यावत असल्याचे दिसते. शरद पवारांच्या राजकीय कारकीर्दीचा मोह साहित्य, संस्कृती, कला इ. क्षेत्रातील मान्यवरांनाही झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील प्रत्येकावर मग तो विरोधी पक्षातील असो अथवा कोणीही त्यास शरद पवार नावाच्या गारुडाने भुरळ घातल्याचे दिसते. महाराष्ट्रातल्या कुठल्याही घडामोडींचा संबंध शरद पवार या नावाशी जोडला जातो. इतका प्रचंड प्रभाव व पगडा त्यांच्या राजकीय कारकिर्दीने निर्माण केलेला आहे. हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर यांनी आयोजित केलेले चर्चासत्र हे त्याचाच एक परिपाक म्हणावा लागेल. मराठी मनाला उर्जा देणाऱ्या शरद पवारांची प्रतिमा एक 'आपला माणूस' असल्याची भावना जनसामान्यात दिसते. अनेक वेळप्रसंगी शरद पवारांवर अनेकांनी टीका-टिप्पणी केली, अनेकांना त्यांच्या कृतीचा प्रसंगी भयंकर रागही आला पण, त्यांच्यावरील प्रेम काही कमी झाले नाही.

शदर पवारांच्या मातोश्री श्रीमती शारदाबाई कडक शिस्तीच्या होत्या. आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही मुलांनी शिकलं पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. शरद पवारांच्या राजकीय कारकिर्दीची पायाभरणी व समाजकारणाचे बाळकडू शरद पवारांना घरातूनच मिळाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने आचार्य अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, एस. एम. जोशी, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे इ. मान्यवरांचा सहवास व मार्गदर्शन शरद पवारांना लहान वयातच मिळाले. त्यांच्या विचारांचा प्रभाव व संस्कार शरद पवारांना राजकारणाच्या पुढील वाटचालीत मार्गदर्शक व उपयुक्त ठरला.

विद्यार्थीदशेतच व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद, भाषणे इ.मधील सहभागातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पडत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. या आक्रमणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी शरद पवारांनी पुण्यातील महाविद्यालयातील दहा हजार विद्यार्थ्यांचा मोर्चा काढला. या प्रचंड जनसमुदायासमोर शरद पवारांनी भाषण केले. यातूनच त्यांचे राजकीय जीवन बहरू लागले. पुणे शहरातून पुढे ते प्रदेश काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणूनही निवडून आले.

यशवंतराव चव्हाण हे शरद पवारांचे राजकीय गुरू मानले जातात. शरद पवारांची देखील यशवंतरावांवर प्रचंड श्रद्धा व निष्ठा होती. म्हणूनच शरदरावांना त्यांचे मानसपुत्र मानले जाते. यशवंतराव चव्हाणांच्या आग्रहास्तव शरद पवार काँग्रेस पक्षात आले. त्याचवेळी यशवंतरावांनी त्यांना युवक काँग्रेसचे अध्यक्ष केले. नीळकंठ कल्याणी, शंतनुराव किर्लोस्कर इ. उद्योजकांबरोबरीनेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गोविंद तळवळकरांसारख्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन शरद पवारांना सतत मिळाले. डॉ. विश्वास मेहेंदळे शरद पवारांच्या जडणघडणीचा परिचय करून देताना म्हणतात, '' एअर इंडियाचा अध्यक्ष असणारा जे. आर. डी. टाटांसारखा उद्योगपतीही प्रसंगी लोकांना चहापाणी नेऊन देण्याचं काम करतो, त्यात तो कमीपणा मानत नाही. हे एका क्षणी शरद पवार यांना बघायला मिळालं. या गोष्टीचाही त्यांच्या तरुण मनावर खोलवर परिणाम झाला आणि कोणतेही काम करण्यात कमीपणा नाही, हे त्यांच्या मनावर पक्कं बिंबवलं गेलं. ''



C.S.M.'s Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.